**प्रेसनोट दि. ०८.०१.२०२४**

लोकसेवक श्री. बाबुराव बाळासो जाधव, वय-३९ वर्षे, तलाठी पलूस, ता. पलूस जि.सांगली यांना ३२,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार व त्यांचे वडील यांनी खरेदी केलेल्या जमिनीची ७/१२ सदरी नोंद घेवून ७/१२ उतारा देणेकरीता लोकसेवक श्री. बाबुराव बाळासो जाधव, तलाठी पलूस यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी ०५.०१.२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०५.०१.२०२४ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री. बाबुराव बाळासो जाधव, तलाठी पलूस यांनी तक्रारदार व त्यांचे वडील यांनी खरेदी केलेल्या जमिनीची ७/१२ सदरी नोंद घेवून ७/१२ उतारा देणेकरीता ४०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३२,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.०८.०१.२०२४ रोजी तहसिल कार्यालय, पलूस या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री. बाबुराव बाळासो जाधव, तलाठी पलूस यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ३२,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. बाबुराव बाळासो जाधव, तलाठी पलूस रा. बुर्ली, ता.पलूस जि.सांगली यांचेविरुध्द पलूस पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक श्री. विनायक भिलारे, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, धनंजय खाडे, अजित पाटील, सलीम मकानदार, चंद्रकांत जाधव, पोपट पाटील, ऋषीकेश बडणीकर, सुदर्शन पाटील, रामहरी वाघमोडे, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner